नांदेड प्रतिबिंब सकाळ

● मंगळवार, १७ जानेवारी २००६ ● पान ५ ● तापमान : ३४.८ / १२.८ ● आर्द्रता ४१ %

सकाळ
मराठवाडा विशेष
१० औरंगाबाद, मंगळवार, १७ जानेवारी २००६



नांदेड : 'होमिओपॅथी इन क्रिटिकल डिसीज' परिसंवादाचे उदघाटन डॉ. ए. डी. निकम यांच्या हस्ते झाले. या वेळी डॉ. हंसराज वैद्य, डॉ. अशोक बोनगुलवार, डॉ. एस. एन. पाटील आदी.

# होमिओपॅथी परिसंवादाचे नांदेडमध्ये उद्घाटन

नांदेड, ता. १६ (बातमीदार) : होमिओपॅथिक स्टुडंट्स अँड कन्सल्टस् असोसिएशनच्या वतीने आयोजित परिसंवादाचे उदघाटन डॉ. ए. डी. निकम यांच्या हस्ते सोमवारी (ता. १६) हॉटेल रामकृष्णामध्ये झाले. डॉ. हंसराज वैद्य अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संजय पाटील, डॉ. विजय शर्मा उपस्थित होते. परिसंवादात 'होमिओपॅथी इन क्रिटिकल डिसीजेस' या विषयावर नांदेड, मुंबई, नगर, पुणे, परभणी येथील होमिओपॅथिक विद्यार्थी व डॉक्टर यांनी विचार मांडले. डॉ. अशोक बोनगुलवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. इरफान पठाण व डॉ. रुचिता ठाकूर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. निकम यांचा परिचय डॉ. मांजरमकर यांनी करून दिला. डॉ. राहुल काळे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी डॉ. राहुल पाटील, डॉ. राहुल काळे, डॉ. प्रशांत सब्बनवार, डॉ. फिरोज इनामदार, ड्रॉ. संजय खोडके, डॉ. एस. आर. तांदूरकर यांनी पुढाकार घेतला.

